# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/०४/२०२४ (मंगळवार) दुपार


### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २१/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा चोखाळा येथे अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा चोखाळा येथे नाकाबंदी करीत असताना सोनालीका कंपनीचा क्र. डी आय ४७ आर एक्स क्र. एम. एच–४०/सि.ए. २४९७ आढळुन आला. स्टाफने वाहनास थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये ०१ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर चालक **आरोपी नामे– शुभम गजानन कुंभरे, वय २४ वर्ष, रा. बाबदेव** यास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून सोनालीका कंपनीचा क्र. डी आय ४७ आर एक्स क्र. एम. एच.–४०/सि.ए. २४९७ किंमती अंदाजे ३,००,०००/– रू व लाल रंगाची विना नंबरची ट्राली कि. १,५०,०००/– रू व १ ब्रॉस रेती कि. ३,०००/– रू. असा एकुण ४,५३,०००/– रू. चा मुददेमाल जप्त करून आरोपीविरूद्ध पोस्टे अरोली येथे कलम ३७९ भा.दं.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि फुलेकर यांचे नेतृत्वात पोलीस अंमलदार शाम पोकळे, विकी तोतरे यांनी केली.



## अवैध गिट्टीची चोरी करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे कुही अंतर्गत फिर्यादी हा मौजा सालई मेंढा ता. उमरेड येथील पवनपुत्र खदानीवर ठेकेदार म्हणुन काम करतो. दिनांक २२/०४/२०२४ रोजी अशोक लेलॅड कंपनीचा १० चक्का टिप्पर एम एच ४० सी टी ९५९१ हा फिर्यादीला गेट मधुन आत येवुन २० एम एम च्या गिट्टीच्या ढिगारा जवळ लागलेला दिसला. तेव्हा तेथे गिट्टी भरून देणारा चालक **आरोपी नामे चेतन दिपक सोनटक्के** याने सदर टिप्पर मध्ये २० एम एम ४ ब्रास गिट्टी २०,०००/— रू भरून घेवुन जात असता फिर्यादीने सदर टिप्पर चालकाला गेटपास व माल पावती मागीतले असता त्यानी नसल्याचे सांगीतले. फिर्यादीने चेतन सोनटक्के यास विचारले असता ते टिप्पर **विवेक मेश्राम** यांचे असल्याचे सांगितल्याने टिप्पर चालकास फिर्यादी विचारायला गेले असता त्यात असलेले इतर दोन ईसम हे टिप्पर सोडून पळून गेले. घटनास्थळाहुन टिप्पर क्र. एम एच— ४० सी टी ९५९१ किंमती ३०,००,०००/—रू. व २० एम एम ४ ब्रास गिट्टी २०,०००/—रू. असा एकुण ३०,२०,०००/—रू. चा मुददेमाल जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे कुही येथे कलम ३७९, ३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. परी. सहायक पोलीस अधीक्षक प्रभारी ठाणेदार पोस्टे कुही दीपक अग्रवाल सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि ठमके, पोहवा लांजेवार, पोहवा चाचेरकर, राहुल धांडे, नापोशि जावरकर यांनी केली.

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. पारशिवनी :— फिर्यादी नामे— विकास रूपराव सहारे वय १९ वर्षे, रा. दहेगाव यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. २९१/१८ कलम ३०७, ३२४, ३२३ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी नामे —विकास सहारे रा. दहेगाव हा आपल्या साथीदारांसह बसला असता यातील **आरोपी नामे— सागर लीलाधर सहारे वय १९ वर्षे, रा. दहेगाव** हा फिर्यादी जवळ आला व तु पोळयाच्या दिवशी कोमल भुजाडे याच्या सोबत का होता असे म्हणून फिर्यादीला जीवानिशी मारण्याच्या उद्देशाने त्याच्या जवळ असलेल्या धारदार चाकु सारखे हत्याराने वार केले असता फिर्यादीने डाव्या हाताने अडविण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीचे डाव्या हातावर व छातीवर तसेच फिर्यादीची आई सोडविण्याकरिता आली असता आरोपीने तिला सुध्दा उजव्या कोथ्याजवळ व डाव्या हाताला चाकुने मारून जख्मी केले.

सदर प्रकरणाचे तपास पोनि दिपक मस्के यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. ११ भोसले (पाटील) सा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २३/०४/२०२४ रोजी मा. डी. जे. ११ भोसले (पाटील) सा. यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०७ भादवी मध्ये ४ वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रू. दंड ,दंड न भरल्यास ३ महीने कारावास ,कलम ३२४ भादवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रू.दंड ,दंड न भरल्यास ३ महीने कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी माहुलकर सा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन मपोहवा स्मिता मोहनकर यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर